# निवेदन

कृषि सहाय्यकांची रिक्त पदे केंद्रिय पध्दतीने कृषि सेवक म्हणुन निश्चित वेतनावर सरळसेवेने भरती २०१८-२०१९ बाबत पुणे विभाग स्तरावरुन **दिनांक- ०३ जानेवारी २०१९ रोजीची विज्ञापित केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने** दिनांक २२, २३ फेब्रुवारी २०१९ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. त्यानुसार अनुसुचित क्षेत्राबाहेरील व अनुसुचित क्षेत्रातील निवडयादी व प्रतिक्षायादी www.krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर दिनांक- २१ एप्रिल २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सद्यस्थितीत दिनांक २३ मार्च २०२० पासुन कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंद असल्याने सदर निवड यादीतील उमेदवारांना मुळ कागदपत्र पडताळणीसाठी बोलावणे शक्य झालेले नाही. त्याअनुषंगाने अनुसुचित क्षेत्राबाहेरील व अनुसुचित क्षेत्रातील निवड यादीतील झालेल्या उमेवारांनी त्यांचेकडील कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी मुळ प्रमाणपत्र /कागदपत्र व त्यांच्या स्वसाक्षांकीत प्रतीसह विभागीय कृषि सहसंचालक पुणे विभाग, पुणे. कृषि भवन, शिवाजीनगर, नरवीर तानाजी वाडी पुणे- ४११००५ या कार्यालयात खाली नमुद दिनांकास निवड यादीतील क्रमांकानुसार उमेदवारांनी उपस्थित रहावयाचे आहे. त्याबाबत निवडयादीतील उमेदवरास पत्र डाकेने व ईमेलव्दारे पाठविण्यात आलेले आहे.

**१. निवड यादी क्रमांक १ ते ९० दिनांक ०१ जुलै २०२० रोजी सकाळी १०.३० वाजता**
**२. निवड यादी क्रमांक ९१ ते १८० दिनांक ०२ जुलै २०२० रोजी सकाळी १०.३० वाजता**
**३. निवड यादी क्रमांक १८१ ते २६९ व १ अनुसुचित क्षेत्रातील दिनांक ०३ जुलै २०२० रोजी सकाळी १०.३० वाजता**

तरी वर नमुद केलेल्या कालावधीत उमेदवार कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित न राहील्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील याची कृपया नोंद घ्यावी. तसेच शासनाच्या / कृषि आयुक्तालयामार्फत प्राप्त होणा-या सुचनांच्या अनुषंगाने, उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्र / कागदपत्रांच्या पडताळणीच्या आधारे व संदर्भियाच्या अधिन राहुन निवडसुची तयार करण्यात आली आहे याची जाणीव करुन देण्यात येत असून त्याची नोंद घ्यावी.

**खालील प्रमाणे उमेदवारांना लागु असलेली मुळ प्रमाणपत्र व त्यांचे स्वसाक्षांकित छायांकित प्रती सह हजर रहावयाचे आहे.**

१ शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील पदवी/पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणुन मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता धारण केल्याचे प्रमाणपत्र (कृषि पदविका / कृषि पदवी)

२ संगणक हाताळणी/ वापरबाबत D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर, C स्तर पैकी कोणतही एक परिक्षा उत्तीण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MSCIT परिक्षा उत्तीण झाल्याचे प्रमाणपत्र.

३ वयोमर्यादा तपासणी करीता शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (स्कुल लिव्हींग सर्टीफीकेट )

४ ज्या प्रवर्गातुन अर्ज दाखल केला आहे त्या प्रवर्गाचा जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र.

५ उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास प्रमाणपत्र

६ महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ

७ उन्नत आणि प्रगत (नॉनक्रिमिलेअर) गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी नजिकच्या काळात दिलेले प्रमाणपत्र

८ माजी सैनिक असल्यास संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण बोर्डाचे प्रमाणपत्र.

९ महाराष्ट्र राज्याचा रहीवाशी (Domicile) असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.

१० उमेदवार प्रकल्पग्रस्त/भुंकपग्रस्त असल्याबाबतचे जिल्हा पुनर्वसन अधिका-यांचे नजिकच्या काळातील प्रमाणपत्र.

११ उमेदवार खेळाडु असल्यास राज्यस्तर/ राष्ट्रीयस्तर/ आंतरराष्ट्रीयस्तर मधील प्राविण्य असल्यास कोणते स्थान प्राप्त केले आहे त्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र.

१२ उमेदवार अंशकालीन कर्मचारी असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा दाखला.

१३ दिव्यांग उमेदवार असल्यास दिव्यांगात्वाचे प्रमाणपत्र जिल्हा शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत मंडळाचे संगणीकृत मुळ प्रमाणपत्र.( SADAREM प्रमाणपत्र)

१४ बिगरमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी दावा करणा-या बिगरमागास महिला उमेदवारांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले २०१७-२०१८ साठी वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व तहसिलदार तथा उपविभागीय अधिकारी यांना सादर केलेला मुळ प्रस्तावाची छायांकित प्रत, तहसिलदार किवा उपविभागीय अधिकारी यांचे सांक्षाकीत करुन सादर करावे.

१५ उमेदवारांचे ओळखपत्र (आधारकार्ड/पॅनकार्ड/निवडणुक ओळखपत्र/वाहन परवाना इ. )

१६ तसेच ज्या उमेदवारांचे विजाअ/भजब/भजक/भजड/विमाप्र प्रवर्गात निवड झाली आहे त्यांनी सदर २०१७-२०१८ साठी वैधता असलेले प्रमाणपत्रांची छायांकीत प्रत स्वसांक्षाकीत शासन निर्णयान्वये ५०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर सोबत जोडलेल्या परिशिष्ट- ब नुसार शपथपत्र

१७ ज्या उमेदवारांनी अनुसुचित क्षेत्रातील (पेसा) स्थानिक अनुसुचित जमाती या प्रवर्गातील कृषि सेवक पदाकरीता अर्ज केला असेल सदर उमेदवारांनी शासन अधिसुचना दिनांक ०९ जुन २०१४ मधील तरतुदीनुसार स्थानिक अनुसुचित जमातीचा उमेदवार हा स्वतः किंवा त्याचे आई-वडील किंवा त्याचे आजी-आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसुचित क्षेत्रामध्ये दिनांक २६ जानेवारी १९५० पासुन सातत्याने वास्तव्य करीत असल्याचा सबळ पुरावा सादर करावा.

**टिप- उमेदवारांना मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी बोलविणे म्हणजे नियुक्ती देणे असा अर्थ होत नाही.**

**( दिलीप झेंडे )**
विभागीय कृषि सहसंचालक
पुणे विभाग पुणे.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ

**प्रतिज्ञापत्र**

नमुना- अ (नियम- ४ पहा)

मी श्री. श्रीमती/ कुमारी -------------------------------------------- श्री. ---------------------------------- यांचा मुलगा / मुलगी/ पत्नी वय -------- वर्ष राहणार -------------------------------------------------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/ करते की,

१ मी **कृषि सेवक** या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२ आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहे. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्मला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे. ( असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा.)

३ हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र राहील. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- **उमेदवाराचे नांव व स्वाक्षरी**

## परिशिष्ठ- ब

**महाराष्ट्र राज्य शासनाच्या विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ इतर मागासवर्ग/ विशेष मागासप्रवर्गातील अर्जदाराने आरक्षणाचा फायदा मिळण्याकरीता उन्नत व प्रगत व्यक्ती/गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबत सादर करावयाचे शपथपत्र**

मी, श्री/श्रीमती/कुमार/कुमारी ---------------------------------------------------- श्री----------------- ------------------------------------- यांचा मुलगा/यांची मुलगी वय -------- वर्षे, व्यवसाय --------------------- -------------- मु. --------------, गाव/शहर ------------------------------------- तहसील ---------------------- ----------------------------, जिल्हा ---------------------, राज्य-----------------------------येथील रहिवासी असुन याव्दारे दृढपुर्वक कथन करतो की, मी---------------------------------------------या जातीचा/जमातीचा असुन ही जात/जमात केंद्र शासन, मिनिस्ट्रि ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रिव्हन्सेस ॲण्ड पेन्शन्स डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ॲण्ड ट्रेनिंग कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक – ३६०१२/२२/९३ इएसटीटी (एस. सी. टी) दि. ८ सप्टेंबर १९९३ अन्वये सुधारीत केल्याप्रमाणे तसेच केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचने (Notification) नुसार/ शासन निर्णयानुसार शासन सेवेतील आरक्षणाच्या फायदयाकरीता इतर मागासवर्ग प्रवर्गात गणल्या जाते. सदर जात/जमात राज्य शासनाने विहीत केलेल्या मागासवर्गीयांच्या यादीमधील ------------------------ या प्रवर्गात मोडते.

मी दृढपुर्वक असेही कथन करतो / करते की, केंद्र शासनाच्या क्रमांक - ३६०१२/२२/९३ - इएसटीटी (एस. सी. टी) दिनांक ८ सप्टेंबर १९९३ च्या कार्यालयीन ज्ञापनासोबतच्या परिशिष्टातील स्तंभ क्रं-३ मध्ये नमुद केलेल्या व कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३६०३३/५/२००४ - इएसटीटी (आर. ई. एस) दि. १४ ऑक्टोबर २००४, कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३६०३३/३/२००४ - इएसटीटी (आर. ई. एस) दि. १४ ऑक्टोबर २००८ अन्वये सुधारीत केल्याप्रमाणे तसेच केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचने (Notification) नुसार / शासन निर्णयानुसार आरक्षणाच्या फायदयाकरीता मी विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ इतर मागासवर्ग/ विशेष मागासप्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ति/गट (क्रिमिलेअर) यामध्ये मी मोडत नाही.

मी दृढपुर्वक असेही कथन करतो / करते की, माझ्या आई किंवा वडीलांचा किंवा आई आणि वडील या दोघांचाही दर्जा/ उत्पन्न हे ३१ मार्च २०१८ रोजी संपणा-या आर्थिकवर्ष अखेरीस वेळोवेळी विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ इतर मागासवर्ग/ विशेष मागासप्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ति/ गट (क्रिमिलेअर) यांच्याकरीता असलेल्या मर्यादेमध्ये मोडते.

स्थळ :

दिनांक : **उमेदवाराचे नांव व स्वाक्षरी**

**(उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी ने केलेले शपथपत्र/खुलासा रददबातल ठरविण्यात येईल.)**